**तुळशी, दूधगंगा व धामणी प्रकल्पाच्या फेर जल नियोजनास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२५/(प्र.क्र.३१३/२५)/मप्र**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक: १७ एप्रिल २०२६**

**संदर्भ**:- १) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र. मकृखोविम ४०/(४६४ /२०२५)/प्रबां-३/६३६६/२०२५ दि. १६/०९/२०२५

२) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण ०४२३/(१९५/२३)मोप्र-१ दि. ०७/०६/२०२४

३) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.सुप्रमा-२०१६/४४६/(प्र.क्र.१७०/१६)म.प्र. दि. १३/१०/२०१६

४) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(४४/१५) सिंव्य धोरण दि. १७/११/२०१६

**प्रस्तावना:-**

तुळशी, दूधगंगा व धामणी मध्यम प्रकल्पाच्या फेर जल नियोजनास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये खालील प्रमाणे शासनास प्राप्त झाला आहे.

**अ) तुळशी प्रकल्प -**

तुळशी प्रकल्प,ता. राधानगरी, जि. कोल्हापूर हा प्रकल्प भोगावती नदीच्या उपनदी तुळशीवर बांधणेत आला आहे. सन १९७६ मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून पाणीवापर २.५८८ अघफू व सिंचन क्षेत्र ४७२० हे. आहे. राधानगरी तालुक्यामध्ये राधानगरी धरण हे सुमारे १९५२ साली पूर्ण झाले व त्यानंतर तुळशी प्रकल्पाचे काम झाले आहे. त्यामुळे राधानगरी धरणाच्या लाभक्षेत्राच्या सभोवतालचे तुळशी धरणाच्या बाचणी, आरे व बीड या को.प. बंधाऱ्यावरील अनुक्रमे ६८३ हे., ५४५ हे. व ७७९ हे. अशा एकूण २००७ हे. क्षेत्रापैकी अंदाजे १५०० हे. नदीच्या उजव्या तीरावरील अंदाजे क्षेत्र त्या भागातील शेतकऱ्यांनी राधानगरी धरणाच्या पाण्यावर भोगावती नदीवर स्वखर्चाने उपसा सिंचन योजना राबवून सिंचनाखाली आणले आहे. त्यामुळे सदर क्षेत्रासाठी लागणाऱ्या ०.४९ अघफू पाण्याची बचत होत आहे.

तसेच, सद्य:स्थितीत तुळशी नदीवरील को.प.बंधाऱ्यांद्वारे दोन्ही तीरावरील लाभक्षेत्रात हमखास पाऊस असल्यामुळे खरीपात पाणीवापर होत नाही. तसेच लाभक्षेत्रात मान्सूनोत्तर पाणी काही प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे तुळशी प्रकल्पाच्या सिंचनासाठी पाणी वापरात बचत होते. तसेच तुळशी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात केळोशी व खामकरवाडी हे दोन ल.पा. प्रकल्प नव्याने झाले आहेत. त्यामुळे या प्रकल्पांद्वारे भिजणाऱ्या क्षेत्रासाठी लागणाऱ्या पाण्याची बचत होत आहे.

सदर कारणांमुळे बचत होणाऱ्या १.०० अघफू पाणी तुळशी प्रकल्पामधून दूधगंगा प्रकल्पाच्या पंचगंगा व कृष्णाकाठ क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य असल्याबाबत महामंडळाने अहवाल सादर केला आहे. या अनुषंगाने तुळशी प्रकल्पाचे पाणीवापराचे फेरजलनियोजन प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ब) दुधगंगा प्रकल्प -**

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यामध्ये दुधगंगा नदीवर काळम्मावाडी येथे दुधगंगा मोठे धरण बांधले असून सन २००१ पासुन धरणामध्ये पाणीसाठा होत आहे. दूधगंगा प्रकल्प हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांतील आंतरराज्यीय प्रकल्प आहे.

संदर्भिय शासन निर्णय क्र. ०२ नुसार सदरील प्रकल्पाचा एकुण पाणीवापर २७.०४अघफू एवढा असून प्रकल्पिय सिंचन क्षेत्र ४६९४८ हे. आहे. या क्षेत्रापैकी ३६८१ हे. क्षेत्र पंचगंगा व कृष्णा काठावरील असून या क्षेत्राकरिता १ अघफू पाणी देण्याची तरतूद आहे. महामंडळाचे प्रस्तावानुसार, तुळशी प्रकल्पात १ अघफू पाणी शिल्लक राहत असल्याने दुधगंगा प्रकल्पांतर्गत असलेले ३६८१ हे. क्षेत्र दुधगंगा ऐवजी तुळशी प्रकल्पांतर्गत समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे दुधगंगा प्रकल्पात १ अघफू पाणी शिल्लक राहत आहे. त्यामुळे दुधगंगा प्रकल्पाचे फेरजलनियोजन प्रस्तावित आहे.

**क) धामणी मध्यम प्रकल्प -**

धामणी प्रकल्प,ता. राधानगरी, जि. कोल्हापूर हा प्रकल्प धामणी नदीवर बांधणेत आला आहे. सदर प्रकल्पाचा एकूण पाणी वापर ३.८० अ.घ.फू. असून प्रकल्पीय सिंचन क्षेत्र १४०० हे. आहे.

संदर्भिय शासन निर्णय क्र. ०३ नुसार धामणी प्रकल्पाच्या मंजूर द्वितीय सुप्रमामध्ये दुधगंगा प्रकल्पातील ५४२७ हे (१.९२ अघफू पाणीवापर) अंतर्भुत करण्यात आले होते. तथापि या क्षेत्रासाठी दुधगंगा प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालातच तरतूद असल्याने १.९२ अघफू पाण्याची बचत होत आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे फेर जल नियोजन प्रस्तावित आहे.

त्या अनुषंगाने तुळशी, दूधगंगा व धामणी प्रकल्पाच्या फेर जल नियोजन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

तुळशी, दूधगंगा व धामणी प्रकल्पाच्या फेर जल नियोजनास अनुक्रमे परिशिष्ट अ, ब, क नुसार खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) महामंडळाने सादर केलेल्या दूधगंगा-तुळशी व धामणी मध्यम प्रकल्पाच्या फेर जल नियोजनाची संपुर्ण जबाबदारी कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता यांची राहील.

२) सदर नियोजनानुसार एकात्मिक राज्य जल आराखड्यामध्ये उचित बदल करण्यात यावा.

३) सदर फेर जल नियोजनामुळे प्रकल्पाचे क्षेत्र अधिसूचित/निराधिसूचित करणे आवश्यक असल्यास त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

४) बचत होणा-या पाणीसाठ्यातून भविष्यामधे कोणतीही योजना प्रस्तावित केल्यास त्यास स्वतंत्र प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

५) प्रकल्पाच्या फेर जल नियोजनानुसार बचत होणा-या पाण्याची ज्या उपसा सिंचन योजनांकरिता तरतूद करण्यात आली आहे त्या सर्व उपसा सिंचन योजनेस शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/(९६/१४)/जसं(आस्था) दि. २३.११.२०१६ अन्वये सक्षम स्तरावरून मान्यता घेण्यात यावी.

६) प्रस्तावित फेर नियोजनामुळे कृष्णा खोरे पाणी तंटा लवादामधील तरतुदींचा भंग होणार नाही याची खातरजमा महामंडळाने करावी. तसेच, एकत्रित कृष्णा खोरेचे फेर जल नियोजन शासनास सादर करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०४१७१२२००४७१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KALE RAJESH SHRIRAM

Digitally signed by KALE RAJESH SHRIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department, 2.5.4.20=EFCCF1ACB0C7420E61D73F39B9C1FC48432CC58660EF9114351D4B21061A596D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9840C1037F8E67CB885EA6AED6FF1F33CFE46584242D1A9C342CD74DD5078F59, cn=KALE RAJESH SHRIRAM
Date: 2026.04.17 12:21:00 +05'30'

**(राजेश काळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र- परिशिष्ट –अ, ब व क**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री , जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
९) मुख्य अभियंता (द.व प्र) व सह सचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे.
११) उप सचिव (मो.प्र-१/मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि), यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कोल्हापूर.
१३) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

**शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२५/(३१३/२५)/मप्र दिनांक- १७/०४/२०२६**

**परिशिष्ट –अ**

**तुळशी प्रकल्पाचे फेर जल नियोजन**

| **अ.क्र.** | **प्रवर्ग** | **तुळशी प्रकल्प** | | |
|---|---|---|---|---|
| | | **घटक बाब** | **प्रकल्प अहवालानुसार मंजूर पाणी वापर (अघफू)** | **सुधारित पाणी वापर (अघफू)** |
| १ | **सिंचनासाठी (बाष्पीभवनासह)** | अ) नदीवरील उपसा योजना ४७२० हे. | २.३१३ | १.३१३ |
| | | ब) शिल्लक पाणी दूधगंगा प्रकल्पातून वगळलेल्या ३६८१ हे क्षेत्रासाठी | - | १.००० |
| | | **एकूण** | **२.३१३** | **२.३१३** |
| | | क) बाष्पीभवन व्यय | ०.२७५ | ०.२७५ |
| | | **एकूण सिंचनासाठी (बाष्पीभवनासह)** | **२.५८८** | **२.५८८** |
| **२** | **शिल्लक** | | ०.८८४ | ०.८८४ |
| **एकंदरीत एकूण** | | | **३.४७२** | **३.४७२** |

KALE RAJESH SHRIRAM

Digitally signed by KALE RAJESH SHRIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department,
2.5.4.20=EFCCF1ACB0C7420E61D73F39B9C1FC48432CC58660EF9114351D4B21061A596D, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9840C1037F8E67CB885EA6AED6FF1F33CFE46584242D1A9C342CD74DD5078F59, cn=KALE RAJESH SHRIRAM
Date: 2026.04.17 12:21:13 +05'30'

**(राजेश काळे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट –ब

## दूधगंगा प्रकल्पाचे फेर जल नियोजन

| अ.क्र. | प्रवर्ग | दूधगंगा प्रकल्प | | |
|---|---|---|---|---|
| | | **घटक बाब** | **शासन निर्णय दि. ०७/०६/२०२४ नुसार मंजूर पाणी वापर (अघफू)** | **सुधारित पाणी वापर (अघफू)** |
| १ | **सिंचनासाठी (बाष्पीभवनासह)** | अ) कालवा प्रवाही | ८.१२० | ८.१२० |
| | | ब) नदीवरील उपसा योजना | ६.३९० | ५.३९० |
| | | क) बसुदेव भुजाई उसिंयो | ०.९४० | ०.९४० |
| | | ड) बाष्पीभवन व्यय | १.२०० | १.२०० |
| | | ई) शिल्लक पाणी भविष्यकालीन दिंडनेर्ली उसिंयो करिता | ०.०० | १.०० |
| | | **एकूण सिंचनासाठी (बाष्पीभवनासह)** | **१६.६५०** | **१६.६५०** |
| **२** | **पिण्यासाठी** | अ) मंजूर आरक्षण | ५.९५० | ४.९०० |
| | | ब) भविष्यकालीन पाणीपुरवठा योजना | | १.०५० |
| | | **एकूण** | **५.९५०** | **५.९५०** |
| **३** | **औद्योगिक** | | ०.४४० | ०.४४० |
| **४** | **महाराष्ट्र राज्य** | | **२३.०४०** | **२३.०४०** |
| **५** | **कर्नाटक राज्य** | | **४.०००** | **४.०००** |
| | | **एकंदरीत एकूण** | **२७.०४०** | **२७.०४० ** |

KALE RAJESH SHRIRAM

Digitally signed by KALE RAJESH SHRIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department,
2.5.4.20=EFCCF1ACB0C7420E61D73F39B9C1FC48432CC58660EF9114351D4B21061A596D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9840C1037F8E67CB885EA6AED6FF1F33CFE46584242D1A9C342CD74DD5078F59, cn=KALE RAJESH SHRIRAM
Date: 2026.04.17 12:21:25 +05'30'

**(राजेश काळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट "क"

## धामणी प्रकल्पाचे फेर जल नियोजन

| अ. क्र. | प्रवर्ग | घटक बाब | शासन निर्णय दि. १३/१०/२०१६ नुसार मंजूर पाणी वापर (अघफू) | सुधारित पाणी वापर (अघफू) |
|---|---|---|---|---|
| १) | **सिंचनासाठी (बाष्पीभवनासह)** | अ) धामणी प्रकल्प १४०० हे सिंचनक्षेत्र को.प. बंधा-याद्वारे (व्ययासह) | ०.६१४ | ०.४५४ |
| | | ब) दूधगंगा प्रकल्प ५४२७ हे. क्षेत्रासाठी | १.९१६ | -- |
| | | **एकूण अ+ब** | **२.५३०** | **०.४५४** |
| २) | पिण्यासाठी **(बाष्पीभवनासह)** | | ०.५०० | ०.५७० |
| ३) | इतर कारणांसाठी **(बाष्पीभवनासह)** | | ०.७७० | ०.३८० |
| ४) | **शिल्लक पाण्यातून भविष्यकालीन उसिंयो** | **क) दुर्गमानवाड उसिंयो** | | १.२६२ |
| | | **ड) पनोरे उसिंयो** | | १.१३४ |
| | | **एकूण (क + ड)** | | **२.३९६** |
| | | **एकंदरीत एकूण** | **३.८००** | **३.८००** |

KALE RAJESH SHRIRAM

Digitally signed by KALE RAJESH SHRIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department, 2.5.4.20=EFCCF1ACB0C7420E61D73F39B9C1FC48432CC58660EF9114351D4B21061A596D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9840C1037F8E67CB885EA6AED6FF1F33CFE46584242D1A9C342CD74DD5078F59, cn=KALE RAJESH SHRIRAM
Date: 2026.04.17 12:21:39 +05'30'

**(राजेश काळे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**